# आदर्श भारत निर्माणासाठी हनुमंताची उपासना गरजेची

म. टा. प्रतिनिधी, देवळाली कॅम्प

**टाकळी व्याख्यानमाला**

आदर्श भारत निर्माण करण्यासाठी आजच्या पिढीने बल व बुद्धीची देवता हनुमंताची उपासना करणे गरजेचे आहे. दिशाहीन होत चाललेल्या नव्या पिढीला प्रभावशाली बनविण्यास हनुमंतराय आदर्श देवता आहे, असे प्रतिपादन आचार्य किशोरजी व्यास यांच्या शिष्या ऋतुजा वाळिंबे यांनी केले.

आगरटाकळी येथील गोमय हनुमान मंदिरातील उद्धवस्वामी सभामंडपात रामनवमी व्याख्यानमालेचे सातवे पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र टाइम्सचे निवासी संपादक शैलेंद्र तनपुरे, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश एन. के. ब्रह्मे, सुधीर शिरवाडकर, ज्योतिराव खैरनार आदी उपस्थित होते. यावेळी वाळिंबे यांनी हनुमान चरित्रावर प्रकाशझोत टाकताना श्रोत्यांसमोर तत्कालीन परिस्थिती उभी केली. आजच्या काळात असलेल्या अदृश्य वाईट शक्तींचा नाश करण्याचे सामर्थ्य चिरंजीव अशा हनुमंताठायी आहे. त्यामुळे अवघ्या देशभरात प्रत्येक गावात हनुमानाची मंदिरे आहेत, असे त्यांनी नमूद केले.



ऋतुजा वाळिंबे यांचे प्रतिपादन

प्रमुख अतिथी तनपुरे यांनी, समर्थ रामदासांनी सिद्ध अक्षरात लिहिलेली व धुळे येथील वाग्देव मंदिरात सुरक्षित असलेली वाल्मीकी रामायणाची प्रत येथे अभ्यासासाठी उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी आर. डी. अणेकर, सुरेश कुलकर्णी यांनी श्लोकपठण केले. ओंकार शौचे यांनी सूत्रसंचालन केले.